| नियमित दिवाणी दावा क्र.५५०/२०२४ मधील निशाणी क्र.१२ वरील आदेश.<br>(चांगदेव टकले व इतर विरुध्द खंडू कोकरे व इतर) | MHAH140009762024 |
| --- | --- |

प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ३९ नियम १ अन्वये प्रतिवादींने वादीस दावा मिळकतीमधील ऊसतोड व ऊस वाहतूकीसाठी बेकायदेशीर हरकत करु नये असा तूर्तातूर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रस्तुत अर्जासोबत वादींने शपथपत्र दाखल केले आहे.

२. **वादीचे थोडक्यात कथन खालील प्रमाणेः-**

वादींने प्रतिवादींविरुध्द निरंतर ताकीद मनाई हुकुमासाठी दावा दाखल केला आहे. दाव्यातील प्रतिवादी क्र. २ व ४ यांच्या विरुध्द एकतर्फा आदेश झालेला असून प्रतिवादी क्र.१ व ३ यांची कैफियत येणेवर आहे. दावा कलम १ई च्या मधून असलेल्या दक्षिण-उत्तर रस्ता गट क्र.३१२ च्या उत्तर बांधावरुन गट क्र.३१२ च्या दक्षिण बांधाने असलेल्या रस्त्याशिवाय इतर कोणताही रस्ता नाही. सदरचा रस्ता मा. तहसिलदार, नेवासा यांनी दिला असून सदरच्या निकालावर अपील दाखल झाले नाही व कोणताही मनाई हुकुम नाही. वादी यांचे दावा कलम १ब गट क्र. ३००/४, १अ गट क्र. ३००/२, १क गट क्र.३०३, १इ गट क्र.३०४, १उ गट क्र.३००/१ व १ऊ गट क्र.३०२ या मिळकतीमध्ये ऊसाचे पीक असून चालू गळीत हंगामासाठी सदरचा ऊस लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना व मुळा सहकारी साखर कारखाना, सोनई यांच्याकडे गळीतास पाठविणे अत्यंत गरजेचे आहे. परंतु, प्रतिवादी हे मा. तहसिलदार यांनी दिलेल्या रस्त्याच्या वहिवाटीस विनाकारण हरकत करुन ऊस

वाहतूकीस हरकत करीत आहेत. प्रतिवादींने वादीला तुमचा ऊस या रस्त्याने जावू देणार नाही अशी धमकी दि.२३.१२.२०२४ रोजी दिली. प्रतिवादी हे रस्त्यावर पाणी सोडणे, खड्डे करणे अशा प्रकारे बेकायदेशीर कृत्य करीत आहेत. सबब, दावा कलम १अ ते १इ व १उ, १ऊ यामधील ऊसतोड व ऊस वाहतूकीस प्रतिवादींने हरकत करु नये असा मनाई हुकुम मिळावा अशी वादीने मागणी केली आहे.

३. प्रतिवादी क्र. २ व ४ यांना दाव्याच्या समन्सची बजावणी होवून देखील ते दाव्यात हजर न राहिल्याने त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारित केला. प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी निशाणी १५ वर प्रस्तुत अर्जास म्हणणे तसेच दाव्यास कैफियत दाखल केली आहे. प्रतिवादींने वादीचा दावा नाकारुन पुढे कथन केले आहे की, वादींने दाव्यामध्ये ज्या रस्त्याचा उल्लेख केला आहे त्या रस्त्याबाबत अद्यापपावेतो मा. तहसिलदार यांच्याकडे कोणत्याही प्रकारची केस चाललेली नाही. वादींने दाव्यामध्ये जो रस्ता नमूद केला आहे तो रस्ता अस्तित्वात नाही. केवळ प्रतिवादींना त्रास देण्यासाठी वादींना प्रतिवादींच्या क्षेत्रातून नवीन रस्ता तयार करावयाचा आहे. तहसिलदार, नेवासा यांच्याकडे रस्ता केस क्र.३६/२०२३ ही मुक्ता केरु कोकरे व प्रतिवादी यांच्यामध्ये रस्त्यासंदर्भात होती. त्या केसमध्ये वादी क्र.१ ते ८ यापैकी कोणीही पक्षकार नव्हते. त्यामुळे रस्ता केस क्र. ३६/२०२३ चा आदेश या दाव्यास लागू होत नाही. रस्ता केस क्र. ३६/२०२३ यावरील निकालाविरुध्द प्रतिवादींने प्रांत साहेब, उपविभागीय अधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडे अपील दाखल केले असून त्याचे कामकाज चालू आहे. रस्ता केस क्र. ३६/२०२३ व वादी म्हणतात ते दोन्ही रस्ते वेगवेगळे आहेत. केवळ रस्ता केस क्र.३६/२०२३ च्या आदेशाचा गैरफायदा घेवून वादी मनाई हुकुम घेण्याच्या

विचारात आहेत. वादी क्र.३ बाळासाहेब ढेपे यांनी त्यांच्या नावावरील क्षेत्राची विक्री केलेली आहे. त्यांच्या नावावर कोणतेही क्षेत्र शिल्लक नाही. वादींना रस्त्याबाबत या न्यायालयात आदेश मागणी करण्याचा अधिकार नाही. महाराष्ट्र महसूल अधिनियम कलम ५(२) व १४३ प्रमाणे वादींनी महसूल खात्याकडे योग्य ती कायदेशीर कारवाई करावी. त्यामुळे या न्यायालयास प्रस्तुत दावा चालविण्याचा अधिकार नाही. वादी यांना त्यांच्या क्षेत्रामध्ये जाण्यासाठी दुसरीकडे रस्ता असून ते नेहमी त्या रस्त्याने ये–जा करतात. सबब, वादीचा अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. वादींतर्फे विधिज्ञ श्री. एन.एस.जोशी व प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. एस.एस.गव्हाणे यांचा युक्तीवाद ऐकला. दाखल सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले.

५. अर्जाच्या निर्गतीच्या दृष्टीने माझे विचारात उपस्थित झाले. त्यांचे सकारण निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे–

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी सकृतदर्शनी सदरचा दावा त्यांच्या लाभात आहे असे असे सिध्द करतात काय ? | होय |
| २. | वादी न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने आहे असे सिध्द करतात काय ? | होय |
| ३. | तुर्तातुर्त मनाई आदेश नाकारल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल काय ? | होय |
| ४. | आदेश काय? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

६. दाव्याच्या पुष्ठ्यर्थ वादींच्या वतीने दावा मिळकतीचे ७/१२ उतारे, वादींचे आधारकार्ड व साक्षीदारांचे शपथपत्र, रस्ता केस क्र. ३६/२०२३ मधील आदेशाची प्रत व तहसिलदार नेवासा यांच्याकडील दि.१९.१०.२०२० रोजीचे संमतीपत्र, मौजे देडगाव येथील गट क्र. ३०० च्या नकाशाची प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत. तसेच प्रतिवादींने तहसिलदार नेवासा यांच्याकडे दाखल केलेल्या केसचा अहवाल, रस्ता केस क्र. ५३/२०२३ मधील रोजनामा, तहसिलदार नेवासा यांच्यासमोर केलेले संमतीपत्र इत्यादी कागदपत्रे दाखल केली आहेत. त्याचबरोबर प्रतिवादींच्या वतीने खालील न्यायनिवाडे सादर केली आहेत.

**A**) **Baburao Ganpati Mali Vs**. **Balasaheb Anna Patil**, 2007 (2) **ALL MR** 364

**B**) **Mohd**. **Ismail Gulam Shaikh**, 2016 (3)**Mh**.**L**.**J**.247

**C**) **Mrs**. **Assuncena Do Rego Vs**. **Mr**. **Simplicio P**.**C**.**Fernandes**, 2008 (3) **Mah**.**L**.**R**. 523

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता –</u>**

७. वादीने दाव्यात कथन केले आहे की, दावा मिळकत कलम १इ गट क्र.३१२/१ ही प्रतिवादींच्या नावावर आहे. वादींना त्यांच्या दावा मिळकतीत येणे–जाणे साठी प्रतिवादींच्या गट क्र. ३१२/१ मधून दक्षिण–उत्तर रस्ता आहे. सदरचा रस्ता गट क्र. ३१२/१ च्या मधून गट क्र. ३०० च्या उत्तर बांधावरुन व गट क्र. ३१२ च्या दक्षिण बाजूने पूर्व–पश्चिम पुढे गट क्र. ३०२, ३०३ व ३०४ च्या पश्चिम बाजूने तसेच गट क्र. ३१२ च्या पूर्व बाजूने जातो. वादींना त्यांच्या मिळकतीमध्ये जाणेकरीता सदर रस्त्याशिवाय इतर

कोणताही रस्ता नाही. परंतु, प्रतिवादी वादींना सदर रस्त्याच्या वहिवाटीस हरकत अडथळा करतात. याउलट प्रतिवादींचे कथन आहे की, दाव्यात नमूद केल्याप्रमाणे कोणताही रस्ता अस्तित्वात नाही. वादींना दुसरा रस्ता उपलब्ध आहे व त्याचाच ते वापर करतात. रस्ता केस क्र. ३६/२०२३ यामधील आदेशाचा गैरफायदा घेवून वादींने प्रस्तुत दावा दाखल केला आहे. वादींने अभिलेखावर रस्ता केस क्र. ३६/२०२३ याच्या निकालाची प्रत जोडलेली आहे. सदर निकालाचे अवलोकन केले. सदरची केस मुक्ता केरु कोकरे यांनी या दाव्यातील प्रतिवादी यांच्याविरुध्द दाखल केलेली होती. त्याचा दि.१६.०२.२०२४ रोजी निकाल लागला. त्यामध्ये मा. तहसिलदार यांनी मुक्ता कोकरे यांना त्यांच्या गट क्र. ३१२/२ व ३१२/३ या मिळकतीमध्ये जाणेयेण्यासाठी गट क्र.३१२/१ च्या उत्तर बांधाने ओढ्याच्या दक्षिण टोकाकडून पुढे पश्चिम–पूर्व असा रस्ता मंजूर केला आहे. सदर आदेशामध्ये असे नमूद केलेले आहे की, गट क्र. ३१२ च्या मधून पूर्व–पश्चिम ओढा आहे. सदर केसमध्ये तहसिलदार यांनी गट क्र.३१२/१ म्हणजेच प्रतिवादीच्या उत्तर बांधाने रस्ता मंजूर केलेला आहे. सदर आदेशाच्या अनुषंगाने प्रतिवादींचे कथन आहे की, मा.तहसिलदार यांनी दिलेला रस्ता व दाव्यात नमूद केलेला रस्ता वेगवेगळे आहेत.

८. तसेच वादींने दाव्यासोबत साक्षीदार नामे जालिंदर गंगाधर नांगरे, गोरक्षनाथ गंगाधर नांगरे यांचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यामध्ये साक्षीदारांनी दाव्यात नमूद केल्याप्रमाणे वादींना त्यांच्या मिळकतीमध्ये ये–जा करण्यासाठी प्रतिवादींच्या गट क्र.३१२/१ मधून रस्ता आहे असे कथन केले आहे. त्याचबरोबर वादी व प्रतिवादी दोघांनी रस्त्यासंदर्भात मा. तहसिलदार यांच्यासमोर केलेले संमतीपत्र दाखल केलेले आहे. दोन्ही संमतीपत्रामध्ये

वेगवेगळ्या गटातून रस्ता असल्याचे नमूद केले आहे. परंतु, या क्षणी त्यापैकी कोणते संमतीपत्र खरे आहे हे ठरवणे शक्य नाही. प्रतिवादींच्या कथनानुसार वादींना दुसरा रस्ता उपलब्ध असून त्यानेच ते ये–जा करतात. परंतु, दुसरा रस्ता असल्याबाबत प्रतिवादींने कोणताही कागदोपत्री पुरावा किंवा साक्षीदारांचे शपथपत्र दिलेले नाही. दाव्यातील साक्षीदारांचे शपथपत्र व अभिलेखावरील कागदपत्र यावरुन प्रतिवादींच्या गट क्र. ३१२/१ मधून रस्ता असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी हे सदर रस्त्यावरुन ऊसतोड व ऊस वाहतूकीस हरकत अडथळा करीत आहेत. सध्या ऊस गळीताचा हंगाम सुरू असून तो अंतिम टप्प्यात आहे. अशा परिस्थितीत वादींचा ऊस वेळेत कारखान्याकडे न गेल्यास त्यांचे नुकसान होवू शकते. याउलट वादींची मागणी मान्य केल्यास प्रतिवादींचे कोणतेही पैशात न भरुन येणार नुकसान होण्याची शक्यता नाही. त्यामुळे न्यायाचा समतोल वादींच्या बाजूने आहे. प्रस्तुत दाव्यामध्ये वादींने तूर्तातूर्त मनाई हुकुमासाठी अर्ज दाखल केला असून तो प्रलंबित आहे. परंतु, प्रस्तुत अर्जातील कारण विचारात घेता दरम्यानच्या काळात प्रतिवादींनी वादींना त्यांच्या मिळकतीमध्ये असलेल्या ऊसाची तोड व वाहतूक करण्यासाठी हरकत करु नये अशा प्रकारचा तूर्तातूर्त मनाई हुकुम देणे योग्य ठरेल. सबब, मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर मी होकारार्थी नोंदवित असून मुद्दा क्र. ४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. वादीचा निशाणी १२ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींने वादींना त्यांच्या मिळकतीमधील म्हणजेच दावा कलम १अ ते १इ व १उ, १ऊ यामध्ये असलेल्या ऊसाची चालू गळीत हंगामात तोड व वाहतूक करण्यास संपूर्ण

ऊसाची वाहतूक होवेपावेतो कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करु नये असा तूर्तातूर्त मनाई आदेश पारित करण्यात येतो.

३. खर्चाबाबत अंतिम निकालावेळी आदेश पारित केला जाईल.

SANDHYA YUVRAJ SUL

Digitally signed by SANDHYA YUVRAJ SUL
Date: 2025.02.20 18:31:08 +0530

**(संध्या यु. सुळ)**

दिनांक–२०/०२/२०२५

२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नेवासा, जि. अहमदनगर